# महाराजा सयाजीराव गायकवाड

**डॉ. पद्मा मोहनराव जाधव**
सहयोगी प्राध्यापक,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
सी.टी.ई.परभणी

**प्रास्ताविक**

आपल्या भारतभूमीला भूषणावह ठरणारे अनेक नररत्ने इथे जन्मले. ज्यांच्या कर्तृत्त्वाची नोंद भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी केलेली आहे. या नररत्नांपैकीच हिंदुस्थानच्या इतिहासातील एक सोनेरी पान असलेले नररत्न म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड हे होय.

**परिचय**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा जन्म 17 मार्च 1863 रोजी नाशिक जिल्हयातील काळवणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गोपाळराव काशीराव गायकवाड हे होते. खंडेराव गायकवाड हे बडोदे संस्थानाचे संस्थानिक होते. त्यांनी बडोदे संस्थानावर 14 वर्षे राज्य केले. खंडेराव महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी जमनाबाई यांनी गोपाळराव काशीराव गायकवाड यांना दिनांक 27 मे 1875 रोजी दत्तक घेतले व त्यांचे नाव सयाजीराव गायकवाड (तिसरे) असे ठेवले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांची पहिली पत्नी महाराणी चिमणाबाई 7 मे 1885 रोजी निधन पावली. त्याच वर्षी 28 डिसेंबर 1885 रोजी त्यांचा दुसरा विवाह झाला. त्यांना तीन मुले होती. मात्र त्यांची तिनही मुले अकालीच मरण पावली.

**राजकीय दृष्टिकोन**

राज्यकारभार कसा असावा याचे शिक्षण सर टी.माधवराव यांच्याकडून घेतल्यानंत महाराजा सयाजीराव गायकवाड हे 28 डिसेंबर 1881 रोजी गादीवर बसले. प्रशासकीय जबाबदारीची विभागणी हे तत्त्व राजकारभारात लागू करुन राज्य यंत्रणेत सुरळीतपणा निर्माण केला. सल्लागार नेमूण कल्याणकारी योजना अंमलात आणल्या. ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन केले. न्यायव्यवस्थेमध्ये सुधारणा केल्या. भारताच्या इतिहासात बडोदे संस्थान हे **'आधुनिक भारताच्या लोगशाहीची प्रयोगशाळा'** म्हणून ओळखले जाते. शेतकरी कुटुंबातून राजपद प्राप्त झालेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी इ.स.1875 ते 1939 या चौसष्ट वर्षांच्या कारकिर्दीत सामंतशाहीच्या राजवटीच्या परंपरेला छेद देवून लोकतंत्री शासनपद्धतीचा अनोखा प्रयोग राबविला. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या जीवन मूल्यांची आपल्या राज्यकारभारात आणि लोकव्यवहारात रुजवण केली.

**आर्थिक दृष्टिकोन**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी गादीवर आल्यावर राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या. त्यांनी रेल्वे आणि सडकांचे जाळे उभारणे, सहकारी बॅंका स्थापन करणे, कारखाने काढणे, शेतीविकासासाठी जलसंधारण, नालाबडिंग, शेतीसाठी आधुनिक अवजारांचा वापर करणे, कृषिशिक्षणाला चालना देणे इत्यादीस उत्तेजन दिले. राष्ट्रविकासाचे मूळ हे आर्थिक विकासात असते हे जाणणारा हा द्रष्टा राजा होता. यावरुन त्यांचा आर्थिक दृष्टिकोन किती दिशादर्शक होता हे स्पष्ट होते.

**शैक्षणिक दृष्टिकोन**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा शैक्षणिक दृश्टिकोन अत्यंत दूरगामी होता. 1893 मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सुरु करुन ती अल्पावधीतच संपूर्ण राज्यामध्ये लागू

केली. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिश्यवृत्त्या देउन त्यांच्या उच्च शिक्षणातील आर्थिक अडसर दूर केला आणि त्यांच्या शिक्षणाची सोय केली. शेतक—यांच्या मुलांना प्रगत शेती शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देण्यावर भर दिला. अद्ययावत तंत्रशिक्षण, वैद्यकीय सेवांचे प्रशिक्षण, स्त्रियांसाठी व्यायामशाळा, सकस आहार निर्मितीचे शिक्षण अशा कितीतरी प्रागतिक शिक्षणाचा पाया त्यांनी घालून दिला. त्यांनी औद्योगिक व कला शिक्षणाकरिता 'कलाभूवन' ही संस्था स्थापन केली. 'प्राच्य विद्यामंदिर' या संस्थेच्या माध्यमातून प्राचीन संस्कृत ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन करण्यास उत्तेजन दिले.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी ज्ञानाच्या प्रसार आणि प्रचारासाठी 'श्रीसयाजी साहित्यमाला' व श्रीसयाजी बालज्ञानमाला' या दोन मालांमधून उत्तम ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध केली. समाजमनात वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनातून ज्ञानप्राप्ती व्हावी आणि ज्ञानप्राप्तीमधून जीवनदृष्टी विकसित व्हावी यासाठी त्यांनी गावोगावी वाचनालये स्थापन केली. एवढयावरच ते थांबले नाही तर त्यांनी फिरत्या वाचनालयांची देखील सोय केली. आज आपण फिरत्या शाळा, फिरत्या प्रयोशाळा, फिरती वाचनालये या संकल्पना आधुनिक म्हणून स्वीकारल्या असल्या तरी हा प्रयोग महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी फार पूर्वीच केलेला आहे. यावरुन महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा शैक्षणिक दृष्टिकोन किती दूरगामी होता हे सिद्ध होते.

**सामाजिक दृष्टिकोन**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांची सामाजिक क्षेत्रातील कामगिरी अत्यंत उल्लेखनीय आणि अत्यंत मौलिक आहे. त्यांनी पडदापद्धतीबंदी, बालविवाहबंदी, कन्याविक्रयबंदी, मिश्रविवाह, स्त्रियांचा वारसाहक्क, विधवा विवाह, अस्पृश्यता निर्मूलन इत्यादी सुधारणा प्रत्यक्षात अंमलात आणल्या. घटस्फोटासंबंधीचा कायदा संपूण भारतात सर्वप्रथम त्यांनी जारी केला.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी समाजातील सर्व स्तरातील घटकांना शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी प्रयत्न केले. त्यांनी हरिजनांसाठी अठरा शाळा काढल्या. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली आणि त्यांची बडोदे संस्थानात उच्च पदावर नेमणूकही केली. त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन आणि सुधारणाच्या प्रत्यक्ष पुरस्कारांमुळे त्यांना इ.स. 1904 मध्ये 'राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या' अध्यक्षपदाचा मान देखील मिळाला. एक सामाजिक जाणिवा प्रगल्भ असलेला आणि सामाजिक भान असलेला राजा माणूस असे त्यांचे वैशिष्टय आणि वेगळेपण सांगता येईल.

**सौंदर्यविषयक दृष्टिकोन**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बडोदे संस्थानाचा विकास अत्यंत कलापूर्ण दृष्टिकोनातून केला होता. बडोदे ही कलापूर्ण व प्रेक्षणीय नगरी ठरली याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी बांधलेल्या सुंदर वास्तू होय. लक्ष्मी विलास राजवाडा, वस्तुसंग्रहालय, कलावीथी, श्री सयाजी रुग्णालय, नजरबाग राजवाडा, महाविद्यालयाची इमारत इत्यादी वास्तुंची निर्मिती करुन त्यांनी बडोद्याची शोभा वाढविली.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांना प्रवासाची अत्यंत आवड होती. हा प्रवास ते केवळ मनोरंजनासाठी म्हणून करत नसत तर त्यांनी जगभर प्रवास केला आणि जेथे जेथे, जे जे चांगले जाणवले, अनुभवले त्याचा चोखंदळपणे स्वीकार करुन आपल्या संस्थानाच्या भरभराटीसाठी सतत प्रयत्न केला. यावरुन त्यांची आपल्या संस्थानाच्या विकासाविशयीची तळमळ आणि दृष्टी किती व्यापक होती हे स्पष्ट होते.

**भारतीय स्वातंत्र्यलढयातील योगदान**

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे भारतीय स्वातंत्र्यलढयामध्येही अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे. लंडन येथे झालेल्या पहिल्या दोन गोलमेज परिषदांना देखील ते हजर होते. लोकमान्य टिळक, योगी अरविंद घोष या नेत्यांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होतो. भारतीय स्वातंत्र्यलढयातील क्रांतीकारकांची देखील त्यांनी

पाठराखण केले. यावरुन राष्ट्राच्या स्वातंत्र्याप्रती असलेली त्यांची तळमळ स्पष्ट होते.

**समारोप**

महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक, प्रबोधनात्मक आणि सुधारणावादी चळवळीत महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे मोलाचे योगदान आहे. महाराजांच्या या सर्वांगीण योगदानाचा वारसा राष्ट्राच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी देखील प्रेरणादायी ठरणारा आहे. ज्ञानवृद्धी, समाजसुधारणा व शिस्तबद्ध प्रशासन या सर्वच बाबतीत ते यशस्वी ठरले. पंडित मदनमोहन मालवीय यांनी 'हिंदुस्थानचा शेवटचा आदर्श राजा' या अत्यंत यथोचित शब्दात त्यांचे वर्णन केले आहे ते योग्यच आहे. भारतमातेच्या या थोर सुपुत्राचे दिनांक 6 फेब्रुवारी 1939 रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या विचारांचा व कार्याचा आदर्श समोर ठेवून भावी राष्ट्रविकासाची आणि राष्ट्रनिर्माणाची दिशा ठरविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. वरखेडे,रमेश संपा., (2017) , महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग –1, औरंगाबाद : महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती
2. वरखेडे,रमेश संपा., (2017) , महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषणसंग्रह भाग –3, औरंगाबाद : महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती
3. जोशी लक्ष्मणशास्त्री, (1976), मराठी विश्वकोश खंड 4, मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
4. *www.sayajiraogaikwad.wikipedia.com*